# प्रकरण ३

## शिवाजी सावंत यांच्या कादंबरीचे वेगळेपण

मागील प्रकरणामध्ये शिवाजी सावंत यांच्या संपूर्ण जिवन प्रवाहाचा आढावा घेतला असून त्या अनुषंगाने त्यांच्या संपूर्ण वाड.मय निर्मितीच्या मागील भूमिका जाणून घेतली असून ह्या प्रकरणामध्ये त्यांच्या 'मृत्युंजय' 'छावा' 'युगंधर' या कादंबरीच्या लोकप्रियतेच्या व वेगळेपणाच्या कारणांची मीमांसा करावयाची आहे.


मृत्युंजय

१९६७ साली प्रकाशित झालेल्या 'मृत्युंजय' या कादंबरीने लोकप्रियतेचे अनेक उच्चांक निर्माण केलेले दिसतात. 'मृत्युंजय' ही कादंबरी समीक्षकांच्या चिंतनाला ज्या प्रमाणे आव्हान करताना दिसते. त्याच प्रमाणे ती सर्व सामान्य वाचकाला सुद्धा मनापासून आवडलेली दिसते. याचे कारण १९६० नंतरच्या काळातील मराठी साहित्यात सापडले. या काळात दलित साहित्यिकांच्या लेखनाला सुरुवात झाली होती. 'मालतीबाई बेडेकर' यांनी १९५० साली 'बळी' या कादंबरीच्या रुपाने मराठीतील शोषित समाजाचे दाहक वास्तव प्रकट झाले तर १९६० साली 'कोसला' या कादंबरीच्या रुपाने 'भालचंद्र नेमाडे' यांनी गैररोमॅन्टिक नायकाचे चित्र साकारलेले होते. 'गारंबीचा बापू' मध्ये 'श्री. ना. पेंडसे' यांनी ॲन्टी हिरो' प्रभावीपणे सादर केला होता. याच काळात ग्रामीण भागातील समाजाच्या व्यथा, वेदना ग्रामीण साहित्यापासून सादर केल्या जात होत्या. हजारो वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्रीच्या वेदनेला आणि आक्रोशाला साहित्यातून वाट मिळू लागली होती. शोषित समाज घटकांच्या चित्रणातून प्रस्थापितांच्या प्रतिष्ठितांच्या विरोधाची धार अधिकच तीव्र बनू लागली होती. त्यातूनच निषेध आणि विद्रोहाची ठिणगी स्फुलींग पावली होती.

याच दरम्यान 'मृत्यूंजय' प्रसिध्द झाला. तिच्यातील नायक शोषित आणि पिडीत होता. साहजिकच 'मृत्युंजय' ही शोषित समाजाची व्यथा मानून तिला विद्रोह व निषेधाच्या प्रवाहात सामिल करण्याचा प्रयत्न झाला.

परंतु 'मृत्युंजय' कादंबरीतील विद्रोह व निषेधाला भारतीय संस्कृतीची ऊब मिळाली असून तिच्यातील निषेध, विद्रोह यांचे भारतीय मानसिकतेशी एक अतूट नाते असलेले दिसते. परंतु ते समकालीन वास्तवाशी नाही. या कादंबरीतील नायकाच्या रुपाने भारतीय सामान्य माणसाला आपल्या आंतरिक भावनांना शब्दांच्या रुपाने वाट मिळाली. परिणामी 'मृत्युंजय' ही वाचकांच्या आत्मीयतेला कारणीभूत झालेली दिसते.

अशा 'मृत्युंजय' या कादंबरीच्या वेगळेपणाचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

### १) **पौराणिक वातावरण निर्मिती –**

शिवाजी सावंतांनी आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने वाचकांना वर्तमानकाळाच्या पडद्यातून बाजूला सारुन महाभारत कालीन वातावरणात सहज रमविले आहे. ते सामर्थ्य त्यांच्या जवळ निश्चित असलेले दिसते. किशुक, सातवण, डंडणी, मधुक, पाटल, खदीर अशा वृक्षांची नावे वाचल्यानंतर पत्ररथ, श्येन, क्रौंच, कपोत असे पक्षी पाहिल्यानंतर मन सहज भूतकाळात प्रवास करायला लागल्याचे दिसते. 'शूल,

तोमर, प्रास, शतघ्नी, भृशुंडी ही शस्त्रे आणि सुचीपर्ण, नाराच, जिदम इ. बाणांची नावे ती जाणीव दृढ करतात. उत्तरीय, अधरीय, अश्वपाल, गोपाल, पाकशाला युध्दशाला, गवाक्ष, रथनीडा अशा शब्दांना वाचल्यानंतर वाचकाला वर्तमान काळाचा पूर्णपणे विसर पडायला लागतो. गायक, नर्तक, कृषीजन, चर्मकार, कुंभकार, पंडीत, योध्दे हे लोक भेटले की, त्या काळाशी सहज समरस होताना दिसतो. दुर्वास ऋषींचे मंत्र सामर्थ्य, परशुरामाची तपश्चर्या, पितामह भीष्मांचा मेघस्वन यामुळे इंगुदीच्या तेलाने उजळणाऱ्या दगडी समयांचा त्या काळावर कसा लख्ख प्रकाश पडतो.

## २) अनेक प्रसगांना वास्तवरुप देण्याचा बुध्दि पुररसर प्रयत्न –

प्रत्येक मानवी समूहाचा इतिहास हा चमत्कारांनी भारावलेला असतो. इतिहास रुप महाकाव्य असणारे महाभारत सुध्दा याला अपवाद नसलेले दिसते. शिवाजी सावंत यांनी महाभारतातील अशा काही चमत्कारांना काही प्रमाणात बुध्दि पुरस्ससर वगळून कर्ण चरित्र साकार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.त्यामुळे वाचक कोणत्याही पौराणिक जगात न वावरता नित्याच्या मानवी कार्यकारणबध्द जगातच असलेला दिसतो. त्यामुळे तेते प्रसंग वाचित असताना वाचकाला एक वेगळीच गोडी निर्माण होताना दिसते.

'अभिमन्यूच्या' कलेवरावर लथ्था प्रहार करणाऱ्या जयंद्रथाचा सुर्यास्ताच्या आत वध करीन. अशी प्रतिज्ञा अर्जुनाने केल्या नंतर ती प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी श्रीकृष्णाने मायेने अंधार केला आणि जयंद्रथ दिसताच पुनश्य प्रकाश निर्माण केला व अर्जुन करवी त्याचा वध करवून घेतला. असे मूळ महाभारतात वर्णन असलेले दिसते. परंतु शिवाजी सावंतांनी त्या दिवशी खग्रास सुर्यग्रहण होते त्यामुळे साहजिकच सूर्यास्त झाल्याचा भास निर्माण झाला असे या प्रसंगाला रुप दिले आहे.

व्दैतवनात पांडव रहात असताना त्यांना आपल्या वैभवाचे प्रदर्शन करून खिजविण्यासाठी घोषयात्रेचे निमित्त करून दु:शासन कर्ण, शकुनी व विलासवती स्त्रिया यासह दुर्योधन तेथे गेला या प्रसंगाचे मूळ रुप बदलून शिवाजी सावंतांनी त्याला जे नवे रुप दिले आहे. त्यावरुन त्यांचा लेखनामागच्या योजनेची चांगली कल्पना येईल.

लेखकाने या प्रसंगांना पालटून मानवी प्रयत्नांच्या कक्षेत आणून ठेवले आहे. आणि त्या मागच्या भावभावनांना प्रतीतिकारक रुप दिले आहे. व्दैतवनात जाऊन पांडवांना हिणहून त्यांना व्दंव्द युध्दाला प्रवृत्त करावे व त्या निमित्ताने तेथेच त्यांचा निकाल लावावा. असा विचार कर्णाने सुचविला व दुर्यौधनाने तो मानला. गंधर्वांची अफाट सेना पाहून हस्तिना पूराहून आणखी सैन्य मागविण्याचे ठरवून कर्ण परत फिरला. वास्तविक तो घाबरुन परत फिरला होता, पण आपल्या आपल्या अपकृत्याचे तो

मानात समर्थन करु पाहत होता. जय झाल्यावर गंधर्वराजाने मुख्य सेना परत पाठविली आणि मागे राहिलेल्या लहान सेनेचा अर्जुनाने पराभव केला. आणि दुर्योधनाला सोडवून त्याला पुन्हा तेथे पाऊल टाकू नये असे बजावले या अपमानाने दुर्योधनाने प्रायोपवेशन (उपोषण) करण्याचा निश्चय केला पण मागे मोठ मोठ्या राजांचा असाच पराभव झाला असूनही त्यांनी असला वेडेपणा केला नाही. इ. नीति सांगून कर्णाने त्याचे मन वळविले असे हे नवे रुप आहे.

महाभारतातल्या अनेक प्रसंगाची शिवाजी सावंतांनी तर्क शुध्द पुर्नरचना केली आहे. त्यामुळे अशा प्रसंगांना 'मृत्युंजय' मध्ये अभिनव रुप प्राप्त झाले आहे.

## ३) उठावदार व्यक्तिचित्रणे –

मूळ चमत्कृतिपूर्ण प्रसंगांना वास्तव रुप देण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिवाजी सावंतांनी कादंबरीतील व्यक्तिचित्रणांना सुध्दा पुरेपुर न्याय दिलेला दिसतो. त्यांनी व्यक्तिचित्रणांना ठसठशीतपणा व सधनता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

मृत्युंजयाच्या प्रारंभीच मातृहृदयाची राधामाता वाचकांचे लक्ष वेधते. कर्तव्यदक्ष व प्रेमक अधिरथ बाबा आपल्या मनात धर करुन राहतात. अल्लड परंतु कर्णावर अपार प्रेम करणारा व त्याच्या व्यक्तिमत्वा समोर स्वत:ला थिटा माननारा 'शोण' दिसतो. हस्तिनापूरातील निळ्या डोळ्याचा अतिमहत्त्वाकांक्षी दुर्योधन मनाला भावतो. मनात विचारांचा समुद्र खवळत असताना सुध्दा चर्येवर गंभीरता येऊन वावरणारे गुरु द्रोण वाचकांना मात्र विचार करायला लावतात. तत्त्वचिंतक अश्वत्थाम्याची अत्यंत परिणाम कारक अशी आशयधन व्यक्तिरेखा मृत्युंजय कारांनी उभी केली आहे. तर कुंतीची व्यक्तिरेखा संवेदनात्मक पातळीवर चित्रदर्शी पणे आपल्या समोर उभी राहते.[१]

कर्णाच्या जन्म रहस्याला आपल्या मनात येऊन वावरणाऱ्या व त्याच्या बद्दल सहृदय असणारा श्रीकृष्ण वाचकांच्या आदराला पात्र होताना दिसतो. या शिवाय अर्जुन, भीष्म, भीम, युधिष्ठिर, वृषाली, गांधारी. अशा अनेक व्यक्तिरेखांची शब्द चित्रेही अत्यंत प्रभावी व वैशिष्ट्य पुर्ण अशी सावंतांनी रेखाटलेली दिसतात.

## ४) प्रत्यकारी प्रसंग रेखाटन–

मृत्युंजय या कादंबरीचे कथानक जरी मूळ महाभारतावर आधारित असले तरी त्यातील अनेक प्रसंगांना एका वेगळ्या आयामातून पाहण्याचा, सादर करण्याचा प्रयत्न शिवाजी सावंतांनी केला असल्याचे लक्षात येते. त्यामुळे या कादंबरीतील अनेक प्रसंगांना वेगळीच रसवत्ता प्राप्त झालेली दिसते. कर्ण आणि शोण यांच्यातील बंधुत्वाचे नाते वृषाली व कर्ण यांच्यातील वैवाहिक जीवन, प्राप्त कवच कुंडलां विषयी कर्णाला वाटणारी चिंता व त्याच्या अंत:करणाला भेडसावणारी चिंता कर्णाच्या मनाला

अर्जुना विषयी वाटणारा सततचा वैरभाव कर्ण दुर्योधनाच्या मैत्रीचे प्रसंग, कर्ण शरसंधान कौशल्य व त्याचा अपमान, कर्णा बद्दल कुंतीच्या मनातील सल, आणि वात्सल्य भावना, दुर्योधनाची सत्ता लालसा, शिशुपालवधाचा प्रसंग, द्यूत प्रसंग, द्रौपदी वस्त्रहरण प्रसंग, शिकारीच्या वेळी दुर्योधनावर ओढवलेला प्रसंग, ब्रह्मास्त्र प्राप्ती साठी कर्णाने केलेले प्रयत्न आणि नियतीचे उलटे पडलेले दान, श्रीकृष्णाचे कर्णाला पांडवांकडे वळविण्याचे प्रयत्न, कुंती, कर्णभेर, हे व असे कितीतरी प्रसंग शिवाजी सावंतांनी आपल्या रसपूर्ण व चित्रदर्शी प्रतिभेने सजीव केले असून अनेक पात्र. प्रसंगांची कलात्मक गुंफण करुन कथानक वाचकांच्या जिज्ञासे बरोबर पुढे नेण्याचे वेगळे कौशल्य प्रकट केले आहे.

५) **भाषाशैली–**

शिवाजी सावंत यांच्या लेखन शैलीवर 'वि. स. खांडेकर' यांच्या लेखन शैलीचा प्रभाव असलेला दिसतो. अलंकारिकता, तत्त्वचिंतनपरता, आणि प्रतिकात्मक रुपात जीवनावर भाष्य करणारी कधी कधी उपदेशपर दृष्टांताचा आधार घेणारी, चटकदार भाषाशैली ही शिवाजी सावंतांच्या लेखणीची वैशिष्ट्ये ' मुत्युंजय' मधून देखील सहज प्रत्ययास येतात. मृत्युंजयाच्या प्रारंभीची भाषाशैली चमकदार आणि अलंकृत असली तरी पुढे ती अतिशय साधी, गंभीर, सौष्ठवपूर्ण अर्थसमृध्द आणि अनलंकृत बनलेली दिसते. ही भाषा तलम मुलायम, अलंकार प्रचुर वैभव विलासिनी असून सुध्दा ती नटवी-कृत्रिम वाटत नाही. वर्ण्य विषयाला सुसंगत व स्वाभाविक असे या शैलीचे रुप आहे.

६) **निवेदन कौशल्य –**

शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय' या भावकथेला प्रथम पुरुषी आत्मनिवेदनपर प्रतिपादन शैलीची जोड दिली आहे. कर्ण स्वत: जिवंत होऊन आपले हृदयगत उलडून दाखवित आहे. असा आभास त्यांनी निर्माण केला आहे. केवळ कर्णच नव्हे तर इतर प्रमुख व्यक्तिरेखा देखील आपापले मनोगत व्यक्त करीत असल्याचा आभास लेखकाने मोठ्या कलात्मकतेने शेवटपर्यंत टिकवून ठेवला आहे. प्रत्येक पात्राचे हे आत्मकथन आहे. अंतरंग दर्शन आहे. प्रमुख व्यक्तिच्या अंतरंगात प्रवेश करुनच तेथील कर्णा संबंधीची जाणीव प्रकाशित करणारी लेखकाची ही निवेदन पध्दती कल्पकतेवर व भावनात्मकतेवर अधिष्ठित आहे. त्यामुळेच एक उत्कट आस्वाद्यता 'मुत्युंजय' मध्ये सर्वत्र प्रतीत होते. त्यामुळेच मृत्युंजयच्या लोक प्रियतेचे सर्वात अधिक श्रेय निवेदन पध्दतीतून निष्पन्न झालेल्या या फलिताला जाते. आत्मनिवेदनाची सोय असल्यानेच कर्णाच्या अंत: करणातील संघार्षाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटण्यास शिवाजी सावंतांना यश आलेले आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र आपपपल्या ठिकाणी खरे वाटते.

भिन्न भिन्न पात्रांच्या मनोगतातून आकाराला आलेल्या 'मृत्यूंजय' या कादंबरीतील सर्व मनोगते

पूर्णपणे कल्पित आहेत. केवळ ठोकळ घटनांच्या आधारे सावंतांनी केलेला तो केवळ कल्पना विलास असल्याने लक्षात येते. प्रथमपुरुषी निवेदन तंत्राचा वापर केल्या कारणाने कर्णाला तोल गेलेल्या प्रत्येक क्षणी आपल्या कृत्याचे समर्थन करता आले आहे. किंबहूना तेवढयासाठीच सावंतांनी आत्मनिवेदन तंत्राची युक्ती वापरली असावी. आत्मनिवेदनपर शैलीचा वापर करून आणि काही कथित प्रसंगांना कल्पनेव्दारे साकार करणा-या शिवाजी सांवतांनी भाषेव्दारे व शैलीव्दारे 'मृत्यूंजय' च्या कथानकाला महाभारतकालीन वातावरणाची जोड देण्यात निश्चित यश मिळविले आहे.

## ७) महाभारत काळाशी सुसंगत भाषिक संवाद :-

व्यक्तींची, स्थानांची, वृक्षवेलींची, ऋषीमुनीची नावे 'मृत्यूंजय' मध्ये महाभारत काळाशी सुसंगत व संस्कृतशी जवळीक साधणारी आहेत. त्याबरोबर त्या काळाच्या रीतीरिवाज संकेताशी भावनिक तादात्मय साधल्यामुळे तद्रुप चित्रण करण्यास कादंबरीकार यशस्वी झालेला आहे. राजदरबारचे संकेत, युध्द भूमीवरील संकेत, धर्मसंकेत, विवाहवेदीवरील संकेत, रीतीरिवाज, समाजव्यवस्था बंध इत्यादींचे महाभारतकालीन प्रभावी चित्रण व्यक्ती प्रसंगानुरूप 'मृत्यूंजय' मध्ये येतात. त्यामुळे वाचकाला वेगळया पण वास्तव जगाच्या अनुभूतीचा भास देण्यात शिवाजी सांवत यशस्वी झालेले आहेत. कर्णाच्या व्यक्तिचित्रणाचा जेवढा प्रभाव 'मृत्यूंजय' मध्ये आहे. तेवढाच शिवाजी सावंतांनी त्या कादंबरीत जो महाभारत काळाशी सुसंगत भाषिक संवाद साधला आहे. त्याचाही प्रभाव आहे. आणि हे या कादंबरीच्या लोकप्रियतेच्या उच्चांकाचे गमक आहे.

## ८) महाभारतातील कर्ण आणि मृत्यूंजय कर्ण :-

महाभारतातील कर्ण आणि मृत्यूंजय मधील कर्ण यांचा तुलनात्मक अभ्यास करणे जेवढे मनोरंजक ठरू शकते तेवढेच ते अंर्तमुख करणारे देखील ठरेल.

महांभारताच्या पटावर कर्ण ही व्यक्तिरेखा सातत्याने वावरताना दिसत नाही. तर ती आपल्या उक्तीतूनच साकार होताना दिसते. व्यासांनी मूळ महाभारतामध्ये तिला अतिशय गौण अथवा अलक्षित म्हणून साकार केलेले आहे. साहजिकच त्याच्या अंतरिक भावभावनांचा विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन व्यासांना उरले नसावे. म्हणून व्यासांनी तिला स्वार्थी, अतिमहत्वकांक्षी आणि कृतीपेक्षा उक्तीचाच बडिवार अधिक माजविणारी अत्यंत अहंकारी अशी रंगविली आहे.[२]

'मृत्यूंजय' मध्ये मात्र शिवाजी सावंतांनी कर्णाच्या व्यक्तिरेखाला केंद्रवर्ती स्थान दिले आहे.[३] आणि त्याच्या व्यापक आणि बहुमिती व्यक्तिमत्त्वाला कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. सावंतांचा

कर्ण हा उदात्ततेचा महामेरु म्हणून मृत्युंजय मध्ये वावरताना दिसतो. आपल्या हातून घडलेल्या अथवा येऊ घातलेल्या कृत्याची योग्य ती कारण मीमांसा करताना दिसतो. अंगी कर्तृत्व असून देखील हीन कुळामुळे त्याला पराक्रमाची कोठे सुध्दा संधी मिळत नाही. असा शोकांत नायक उभा करण्यात शिवाजी सावंत यशस्वी झालेले दिसतात.

जन्मापासून न्यूनगंडाने पछाडलेला परिस्थितीने गांजलेला आणि अमर्याद महत्त्वाकांक्षेने ग्रासलेला आणि म्हणूनच ताठर, अहंकारी, निदर्य, उन्मत्त, क्षुद्र, निर्लज्ज, अधम झालेला मनुष्य असे महाभारता मध्ये व्यासांनी कर्णाचे चित्र रेखाटलेले आहे. बरोबर या उलट शिवाजी सावंतांनी कर्णाला पौरूष चैतन्याचे, वर्णनिर्भयतेचे आणि निर्मलतेचे प्रतिक जणू श्रीकृष्णाचीच सावली अशा रुपात साकार केलेले आहे.[४]

## ९) 'मृत्युंजय' मधील काल्पनिक प्रसंग –

महाभारताच्या रंगमंच्यावर कर्णाची व्यक्तिरेखा ही अत्यंत तुटक तुटक स्वरुपात वावरताना दिसते. त्यामुळे कर्णाच्या चरित्राची माहिती ही पौराणिक काळाच्या अंधारात धुसर झालेले दिसते. कर्ण हा महाभारतामध्ये आपल्या केवळ मोठ मोठ्या प्रतिज्ञेतून आणि काही मोजक्या प्रसंगातूनच वाचकांच्या समोर येतो. तो ही खलनायक म्हणून.

या सर्व आव्हानांना पेलून शिवाजी सावंतांनी 'मृत्युंजय' मध्ये कर्णाला एखाद्या नायका प्रमाणे सादर केलेला आहे. अर्थात त्यासाठी त्यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेचा वापर करुन अनेक काल्पनिक प्रसंगांची निर्मिती केलेली दिसते. कर्णाचे बालपण, शोण-कर्ण संबंध, राधामाता अधिरथ बाबा - कर्ण प्रसंग, गुरु द्रोणाचार्य - कर्ण प्रसंग, विवाह पूर्व कुंतीचे आयुष्य, कर्ण-दुर्योधन प्रसंग, कर्ण श्रीकृष्ण संबंध इ. अशा अनेक एकापेक्षा एक वरचढ काल्पनिक प्रसंगांची निर्मिती करुन सावंतांनी कर्णाचे चरित्र साकार केलेले दिसते.

लेखकाचे सर्व लालित्य पणास लागलेले दिसते. ते 'वृषालीच्या' व्यक्तिरेखेला साकार करताना मूळ महाभारतात वृषाली ही अत्यंत गौण व्यक्तिरेखेला म्हणून दिसते. त्यामुळे तिच्याकडे कोणाचेच फारसे लक्ष जात नाही. पण मृत्युंजय मध्ये मात्र तीला सावंतांनी वास्तवाला कोठेही न सोडता नायिकेची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली आहे. हेच शिवाजी सावंतांच्या लेखणीचे सामर्थ्य असलेले दिसते.

अशा प्रकारे महाभारतीय पार्श्व भूमीवर रेखाटलेली कर्णाची कल्पित भावकथा असणाऱ्या 'मृत्युंजय' या कादंबरीची निर्मिती करुन शिवाजी सावंत यांनी मराठी रसिकांची मनेमात्र कायमची ऋणी केली आहेत.


छावा

मृत्युंजय सारखी पौराणिक कथेवर आधारित कादंबरी निर्माण केल्यानंतर शिवाजी सावंतांनी 'छावा' च्या रुपाने एक इतिहास कथा वाचकांच्या समोर सादर केली. 'मृत्युंजय' ही कर्णाची कथा असून 'छावा' ही संभाजी महाराजांची इतिहास कथा असल्याकारणाने या दोन्ही ही कादंबरीच्या आशय द्रव्यांमध्ये बराचसा फरक पडला आहे. पुराण कथा ही इतिहास कथे प्रमाणे वास्तवाची कथा नसते. तसेच ती पूर्णपणे काल्पिताचीही कथा नसते. तर पुराण कथा ही वास्तव व कल्पित यांच्या अवास्तव व अकल्पित अशा रंगरुपाची असते. त्यामूळे पुराणकथा व इतिहास यांच्यात महत्त्वाचा फरक ठरतो तो त्याच्या संदर्भ व्यूहात. प्रत्येक पूराण कथेला स्वायत्त असा अर्थ व अर्थ पूर्णता असते. त्या अर्थ व अर्थपूर्णतेला एक मोठा संदर्भ व्यूह असतो. आणि तो संदर्भव्यूह समग्र महाकथेच्या अर्थाचा आणि अर्थपूर्णतेचा असलेला दिसतो.याचाच अर्थ पुराण कथा ही महाकथेचा एक अवयव असलेली दिसते. म्हणजेच पुराण कथा ही महाकथेतील एक उपकथा असते. तसेच हे उपकथापण महाकथेच्या अंगभूतच असलेले दिसते. त्यामुळे पुराण कथा आणि महाकथा एकमेकापासून अलग करता येत नाहीत. म्हणूनच पुराणकथा ही एका अर्थाने तिच्या पुरती एक स्वायत्त कथा ही ठरते. आणि एका अर्थाने ती सापेक्ष उपकथाही ठरते.

इतिहास कथेच्या बाबतीत सुध्दा असाच प्रकार असलेला दिसतो. इतिहास कथेला देखील तिचे स्वायत्त व परायत्त अर्थ संदर्भ असतात. हे दोन्ही अर्थ संदर्भ ऐतिहासिक सत्यतेचे असतात. वस्तुस्थितीचे असतात. आणि वास्तवाचे सुध्दा असतात. त्यामुळे 'मृत्युंजय' आणि 'छावा' या दोन्ही कादंबरीच्या आशय द्रव्यामध्ये बराचसा फरक पडलेला दिसतो.

## १) ऐतिहासिक वातावरण निर्मिती–

'छावा' या कादंबरी व्दारे शिवाजी सावंतांनी मराठी रसिक वाचकांना लिलया शिवकालात रमविलेले दिसते. या कादंबरीतील गडकोटांची वर्णने, युध्दाची वर्णने, वाचल्यानंतर वाचकांच्या डोळ्यासमोर साक्षात तो प्रसंग चलचित्र रुपात उभा रहाताना दिसतो. एवढेच नव्हे तर शिवकालीन समाजातील रुढी, प्रथा, परंपरा, संस्कृती यांचे आलेले वर्णन, शिवकालीन समाजातील बोलीभाषा, माणसांचा रांगडेपणा पाहिल्यानंतर ते समाजचित्र तत्काकालीन समाज संदर्भ घेऊन आलेले स्वाभाविक चित्र वाटते व वाचकांचे मन सहजच शिवकालात जाऊन पोहचते.

हुडवा, खुरचलाखघोडदल, निरोपाचा विडा, तिरकमान, तोफा, ढाल, तलवार, कटाचे खलबत असे शब्द वाचल्यानंतर तर वाचक पूर्णपणे शिवकालमयच झाल्या वाचून रहात नाही.

२) **ठसठशीत व्यक्तिचित्रणे-**

'छावा' कादंबरीचा दुसरा महत्त्वाचा वेगळेपणा म्हणजे त्यातील व्यक्तिचित्रणांचा उठावदारपणा कादंबरीच्या सुरुवातीलाच वाचकांच्या मनात घर करुन रहाते ती 'जिजाबाईंची' व्यक्तिरेखा शांत, संयमी असणारी त्यांची व्यक्तिरेखा मनाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाते. तर छत्रपती शिवाजी महाराजांचे वावरणे वाचकांच्या मनाला कर्तव्य पुर्तीच्या वेगळ्याच वातावरणात नेते. कापूर होळच्या धाराऊच्या रुपाने आपल्या समोर वात्सल्याचा व टाकल्या विश्वासाला कसे जागायचे याचा मूर्तिमंत आदर्श उभा राहतो. येसूबाईच्या रुपाने आदर्श पत्नी वाचकांना भेटते. हंबीरराव मोहित्यांच्या रुपाने विश्वासू मावळा मनाला सुखावतो. तर कवी कुलेशच्या रुपाने मित्रत्वाचा थंडावा मनाला रिझवताना दिसतो. अशी अनेक व्यक्तिचित्रणे शिवाजी सावंतांनी त्यांच्या अंगभूत वैशिष्ट्यासह कादंबरीत वर्णन केलेली आहेत.

या शिवाय रामराजे, सोयराबाई, मोरेपंत, नेताजी पालकर, समर्थ रामदास, दुर्गाबाई, मिर्झाराजा जयसिंग, अकबर आणि औरंगजेब यांची शब्दचित्रे सुध्दा अतिशय परिणामकारक रितीने साकारुन शिवाजी सावंतांनी वाचकांच्या समोर शब्दशः सजीव केलेली दिसतात.[५]

३) **संवाद देखन -**

चित्रदर्शी, सौष्ठवपूर्ण, प्रवाही आणि अमूर्ताला ही मूर्त करणारी भाषा ही शिवाजी सावंतांना मिळालेली अलौकिक देणगी आहे. ह्याचा प्रत्यय ह्याही कादंबरीत आल्यावाचून रहात नाही. परंतु ह्याही पेक्षा 'छावांचे' सगळ्यात महत्त्वपूर्ण वेगळेपण म्हणजे त्यातील तात्विक, चिंतनगर्भ आणि भावपूर्ण संवाद योजना होय. या संवाद योजनेमुळेच कादंबरीतील अनेक प्रसंगांना नाट्यपुर्णता लाभलेली दिसते.

उदा. छ. शिवाजी महाराज - संभाजी महाराज प्रसंग, औरंगजब - संभाजी महाराज प्रसंग, येसुबाई - संभाजी महाराज प्रसंग अशा अनेक प्रसंगाचे दाखले देण्यासारखे आहेत.

पात्रानुरुप संवादाची भाषाशैली हे 'छावा' चे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असलेले दिसते. उदा. छ. शिवाजी महाराजांची भाषाशैली धिरगंभीर व अंर्तमग्न, जिजाऊंची भाषाशैली वात्सल्यपूर्ण तर धाराऊच्या भाषाशैलीला गावरानपणाचा बाज असलेला दिसतो. पात्रानुसार भाषाशैली मुळे 'छावाच्या' कथानकाला गती तर प्राप्त झालीच आहे. त्या बरोबर कादंबरीला देखील एका वेगळ्या उंचीवर नेण्यास ती कारणीभूत झाली असून कादंबरीतील पात्रे वाचकांच्या मनावर बिंबण्यास देखील कारणीभूत झालेली दिसते.

## ४) प्रसंग रेखाटन –

छत्रपती संभाजी महाराजां सारखा विवाद्य नायक निवडून व त्यांच्या हातून घडलेल्या काही प्रमादांना निर्दोष दृष्टीकोनातून वाचकांच्या समोर सादर करण्यासाठी शिवाजी सावंतांनी अनेक प्रसगांना आपल्या अभ्यासू दृष्टीकोनातून वेगळ्या परिमाणासह सादर केलेले दिसते. त्यामुळे अशा प्रसंगांना वेगळेच प्रतीकात्मकता आणि सूचकता प्राप्त झाली आहे.

छत्रपती संभाजी महाराज आणि वडील आबासाहेब यांच्यातील प्रसंग, येसूबाई - संभाजी यांच्यातील कौटुंबिक भावबंध, सोयराबाई आणि संभाजी मधील कटू प्रसंग, संभाजीचे रामराजावरील अतूट प्रेम, कवी कुलेश आणि संभाजी मधील मैत्रीपूर्ण संबंध, अकबर आणि संभाजी मधील हेतूपूर्व प्रसंग, संभाजी आणि धाराऊची वात्सल्य पूर्ण प्रिती, औरंगजेब आणि संभाजी मधील संभाजीच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव देणारे प्रसंग, दिलेरकडून स्वराज्यात परतलेल्या संभाजीचे चित्रण, सज्जनगडावरुन निघून जाणाऱ्या संभाजीच्या मनाची व्यथा, वारसा हक्क प्राप्त करण्यासाठी जिवाचा आटापीटा करणाऱ्या संभाजीची मनोव्यथा इ.

अशा अनेक प्रसंगांना उठावदार करण्यासाठी शिवाजी सावंतांनी आपल्या ईश्वरदक्ष प्रतिभेचा प्रभावी आविष्कार घडवून आणून 'छावा' ला आजपर्यंत ऐतिहासिक कादंबरीच्या इतिहासात एका उच्चतम स्थानावर विराजमान केलेले दिसते.

## ५) पात्रांच्या मनातील सूक्ष्म मनोव्यापार –

'छावा' कादंबरी ऐतिहासिक कादंबरीच्या परंपरेत अत्यंत वेगळी व मानाचे स्थान मिळविणारी कादंबरी असून तिच्या या सन्मानाला कारणीभूत असणाऱ्या अनेक वैशिष्ट्यापैकी महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे शिवाजी सावंतांनी कादंबरीतील प्रमुख पात्रांच्या मनातील भावभावनांचा सूक्ष्म असा आविष्कार लिलया आपल्या कादंबरीत केलेला दिसतो.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनातील घालमेल, जिजाऊ आई साहेबांच्या मनातील संभाजीच्या पोरकेपणा बद्दलची हुरहुर तर संभाजीची सर्वात असून देखील एकटा एकाकी पडल्याची व्यथा, सोयराबाईच्या मनातील सत्ता आकांक्षेचे काळेकभिन्न विश्व. तर येरबाईची पतीनिष्ठा, राणूआक्काची भावा बद्दलची तळमळ, कवी कुलेशचे संभाजीच्या प्रती मित्रप्रेम.

अशा अनेक गोष्टींना व्यापक अर्थाने आणि सकस परिमाणाच्या सहाय्याने शिवाजी सावंतांनी त्या-त्या पात्रांच्या सहाय्याने त्या त्या पात्रांच्या मानसिक मनोव्यापारातून अधिक लख्खपणे वाचकांच्या समोर सादर केलेले आहे. त्यामुळे या कादंबरीला एक वेगळाच बाज प्राप्त झालेला दिसतो.

## ६) इतिहासकारंनी उभा केलेला संभाजी आणि छावा मधील संभाजी –

काही बखरकारांनी इतिहासकारांनी आणि बहुतांश साहित्यिकांनी संभाजी महाराजांना कल्पित प्रियपात्रांच्या गराड्यात इश्कबाजी करताना आणि लटके काव्यमय बोलताना[६] सत्तेच्या हव्यासापायी, वडींलाविरुध्द कट कारस्थाने रचणारा, अतिरिक्त स्त्री आसक्ती बाळगणारा, मद्यपानाच्या आहारी गेलेला, उग्र प्रकृती असणारा, मराठी राज्याला हितकारक नसणारा[७] बेबंदशाहीचा उद्‌गाता असणारा असा रंगविण्यात आला आहे.

शिवाजी सावंत यांनी मात्र वारेमापसंदर्भ वाचन, प्रवास, चिंतन, मनन असे अनेक प्रयास करुन संभाजी राजे हे केवळ राजे नसून ते कविमनाचे आणि विशालकाय अशा संकटातून जात असताना चिवट जीवन वाद सांगणारे राजे आहेत. त्याच बरोबर त्यांच्या सांगाती कवी कुलेश हे देखिल एक तेजस्वी व्यक्तित्व आहे. तसेच संभाजीच्या ठायी झंझावाताचे प्रचंड सामर्थ्य आहे. असे दाखविणाचा प्रयत्न केला आहे.

'छावा' कादंबरी मध्ये लेखकाने संभाजी राजांच्या स्वभावाचा अन्वयार्थ लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. संभाजी राजे पराक्रमाने दैदिप्यमान होते. परंतु त्यांच्या हातुन काही चुका झाल्या. परंतु त्या चुकांच्याकडे क्षमाशील वृत्तीने पाहिले पाहिजे कारण संभाजी राजे जरी असामान्य कर्तूत्वाच्या छत्रपती शिवाजी राजांचे पुत्र असले तरी त्यांच्या भोवतीचे परिस्थिती संदर्भ भिन्न होते. अखेर ते एक माणूस होते. त्यांनाही मन होते. सुख दुःख भाव भावना होत्या. त्यांच्या हातुन चूक घडली म्हणून ते कायमचे खलनायक ठरविणे योग्य नाही. त्यांची तुलना शिवरायांशी केली गेली. पण त्यांचे माणूसपण शोधून मूल्यमापन झालेच नाही. खरे खोटे पारखले नाही. त्याचा शोध शिवाजी सावंतांनी घेतला व संभाजी राजांना एक माणूस म्हणून वाचकांच्या समोर सादर करण्याचा अर्थपूर्ण प्रयत्न केलेला आहे.

## ७) संभाजी महाराजांच्या जीवनातील वादग्रस्त प्रसंगांची तर्कशुध्द पुनर्रचना –


संभाजी महाराज हयात असल्यापासून ते त्यांच्या मृत्युनंतरही सामान्यपणे ३०० वर्षाच्या आसपास ज्यांच्या चारित्र्याचे मन मानेल असे वाभाडे काढून नसलेल्या दोषांचा डाग त्यांच्या ठायी करुन त्यांच्या संपूर्ण चारित्र्याला आणि कर्त्वृत्वाला कलंकित करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. अशा

परिस्थितीत संभाजी महाराजांचे अभ्यासपूर्ण चरित्र वाचकांच्या समोर आणण्यांचा काही प्रतिभावंतानी प्रयत्न केला. त्यातीलच अत्यंत यशस्वी आणि कायमस्वरुपी परिणाम करणारा प्रयत्न केला तो शिवाजी सावंत यांनी. त्यांनी संभाजी महाराजांच्या केवळ कर्तृत्वालाच समाजासमोर आणले नाही. तर त्यांच्या वरील आरोपांचे खंडन देखील अत्यंत अभ्यासपूर्ण पध्दतीने केले. असे करीत असताना त्यांनी संभाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक वादग्रस्त घटनांची तर्कशुध्द पुर्नरचना केली. आणि त्यांच्या चरित्राला अभिनव रुप प्राप्त करुन दिले आहे. म्हणजेच संभाजी महाराजांच्या जीवनकथेची पुर्नघटना करण्याचा अत्यंत अभिनंदनीय यशस्वी प्रयत्न आहे.

संभाजी महाराजांच्या चरित्रामध्ये अगदी मोजक्या अशा वादग्रस्त घटना व प्रसंग असलेले दिसतात. त्यामध्ये शिवाजी महाराजांच्यावरील विषप्रयोग, संभाजी महाराजांचे गोदावरी प्रकरण, त्यांचे सज्जनगडावरुन परस्पर निघून जाऊन दिलरखानाला भेटणे, सोयराबाईची हत्या या घटनांचा सामावेश आहे. या प्रत्येक घटनेला त्यांनी वेगळ्या दृष्टीकोनातून वाचकांच्या समोर सादर केलेले आहे. शिवाजी महाराजावरील विषप्रयोगाचे सत्य त्यांनी अलगद इतिहासाच्या गर्भात लपविले आहे. गोदावरी प्रकरणात त्यांनी संभाजीच्या निष्कलंक चारित्र्याचा आणि निष्पापतेचा आविष्कार घडवून आणला आहे. तर दिलेर खानाच्या प्रसंगात संभाजी महाराजांच्या मानसिक कुचंबणेचा आधार घेतला आहे. तसेच सोयराबाईची आत्महत्या दाखवून शिवाजी सावंतांनी इतिहासावर नव्याने प्रकाश टाकला आहे.

अशा अनेक काल्पनिक घटना प्रसंगांची निर्मिती करुन शिवाजी सावंतांनी संभाजी महाराजांना समाजासाठी, देशासाठी, धर्मासाठी बेदरकार गौरवास्पद व तेजस्वी बलिदान देणारा राजा अशा रुपात साकार केला.

इतिहासामधील संभाजी राजांसारखी वादग्रस्त व्यक्ती निवडून त्यांच्या चारित्र्यावरील दोषांचे पूर्णपणे शमन करुन एक प्रकारे इतिहासाचीच पुर्नघटना करुन निर्माण केलेली 'छावा' ही कादंबरी आपल्या वेगळेपणामुळे निश्चितच ऐतिहासिक कादंबरीच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरते. हीच गोष्ट शिवाजी सावंतांच्या अलौकिक प्रतिभेची साक्ष देते.


युगंधर

'मृत्युंजय' 'छावा' ह्या दोन कादंबऱ्यांनी सर्वसामान्य वाचकांना अत्यंत समाधानी केले. 'छावा' या कादंबरीच्या प्रसिध्दीनंतर सुमारे २० वर्षांनी शिवाजी सावंतांनी 'युगंधर' ही कादंबरी प्रकाशित केली. ही कादंबरी प्रकाशित होण्या अगोदर श्रीकृष्णावर उदंड काव्ये झाली. भक्तीगीते झाली. भारतातील वेगवेगळ्या भाषातील संत मंडळीनी अत्यंत रसपूर्ण अशा भक्तिगीत रचना त्याच्या जीवन चरित्रावर केल्या आहेत. नाटक, खंडकाव्य, यातूनही अनेक ठिकाणी तो नायक म्हणून नांदला आहे. 'महाभारत' सारख्या दूरदर्शन वरील मोठ्या सिरीअलध्ये तो पडद्यावरही दिसला आहे. अनेक भाषांतील प्रतिभावंत साहित्यिकांनी श्रीकृष्ण चरित्रातील एखादा स्वभाव विशेष धरुन कादंबरी हा वाङ.मय प्रकारही हाताळलेला आहे. पण श्रीकृष्णाचे समग्र जीवन आणि तेही रसाळ ललित श्रीमंत भाषेत कादंबरीमध्ये पकडण्याचा प्रयत्न कुणीही केलेला नाही. श्रीकृष्णाला सर्व आयामासह साहित्यबध्द करणे हे प्रचंड काम आहे. हे काम केले ते शिवाजी सावंत यांनी आपल्या 'युगंधर' या कादंबरीच्या रुपाने.

शिवाजी सावंत यांच्या दृष्टीने 'मृत्युंजय कर्ण' आणि युगंधर श्रीकृष्ण या वर्ण निर्भयतेच्या आणि पौरुषचैतन्याच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हजारो वर्ष अंधारात गाडले गेलेले महारथी कर्णाचे अंतर्विश्व 'मृत्युंजय' मध्ये ललितरम्य शैलीत व्यक्त करण्याचे काम सावंतांनी केले आहे. श्रीकृष्णाची बाजू हजारो वर्ष उजेडातच आहे. मात्र चमत्कारंच्या आंगड्या टोपड्यामुळे व त्याच्यावर पडलेल्या श्रध्दाशील परंतु अतिरेकी प्रकाश झोतामुळे तो सर्वसामान्यांना उघड्या डोळ्यांनी बघता येत नव्हता. अशा वेळी शिवाजी सावंतांनी श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वला धक्का न लावता. त्याला चमत्कारांच्या झगमटापासून बाजुला घेऊन अर्जुना प्रमाणे सर्वसामान्यांचा सखा बनवण्याचा व एक पूर्ण पुरुषात त्याला आविष्कृत करण्याचा अत्यंत यशस्वी असा प्रयत्न केला आहे.

'मृत्युंजय' आणि 'युगंधर' या दोन शिर्षकामधील आंतरिक नाते संबंधाचा विचार मांडताना शिवाजी सावंत लिहीतात, 'मृत्युंजय' हे शीर्षक चार अक्षरांचे आहे. 'युगंधर' हे सुध्दा चार अक्षरांचे आहे. 'मृत्युंजय' हे 'य' ह्या व्यंजनावर संपले तर 'युगंधर' हे 'य' ह्या व्यंजना पासून सुरु होते. त्यात एक अनुस्वार आहे. तर यातही एक अनुस्वार आहे.[८]

शिवाजी सावंत यांच्या ह्या वक्तव्यानंतर असे सहज लक्षात येते की 'मृत्युंजय' आणि ' युगंधर' यातील आशयद्रव्य एकच आहे. कारण महाभारताच्या विस्तीर्ण पटावर वावरणाऱ्या ह्या दोन महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा आहेत. अशा 'युगंधर' ला सुध्दा अमाप लोकप्रियता लाभली असुन तिच्या ह्या वेगळेपणाचा उहापोह पुढील प्रमाणे.

## १) पौराणिक वातावरण निर्मिती –

आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने वाचकांना भान विसरायला लावणाऱ्या शिवाजी सावंत यांनी युगंधर मध्ये सुध्दा वाचकांना अतिशय सहजतेने युगंधरी काळात रमविलेले दिसते. कादंबरीतील रानरव्यांचे, धन छड्याचे, श्येन, सारस, चंडोल, क्रौंच, भारव्दाज, चातक, मयुर, कोकीळ, ससाणे, कपोत, गरुड अशा पक्ष्यांची नावे वाचल्यानंतर मनात सहजपणे विभिन्न रंगाच्या पक्ष्याचे थवे उडू लागतात. चंपक, जामुन, औदुंबर, आम्र, साग, कदंब, ऐन, अंजन, कांचन, खैर, केंजळ, हिरड बेहड अशा वृक्षांची नावे वाचल्यानंतर वाचकांच्या मनात हिरव्या कच्च वृक्ष्यांच्या वाटिकांच्या वाटिका बहरताना दिसतात. तर लवण मिश्रीत मऊ गुरगुट्या ओदन व गोरस वाचकांच्या रसनेची चाळवाचाळव करताना दिसतो. या शिवाय रानगर्दभ, गोधन, प्रणिपात, फिरती मुद्‌गल, कक्षाबंधन, हेमगर्भाची मात्रा अशा कित्येक नादमय शब्दांमुळे वाचकांचे मन पुराण काळात रममाण होताना दिसते. मथुरेचे वर्णन, वृदांवनाचे वर्णन, व्दारकेचे वर्णन, हस्तिनापूरचे वर्णन, कुरुक्षेत्रावरील युध्दवर्णन अशी वर्णने वाचित असताना वाचक स्वतःचे भान विसरुन युगंधर काळातच वावरताना दिसतो.

## २) उठावदार व्यक्तिचित्रणे –

वाचकांना वर्तमान काळाचा विसर पाडून युगंधरी युगात रममाण करण्यासाठी त्या काळच्या वातारणाचे हुबेहुब वर्णन करणाऱ्या शिवाजी सावंतांनी श्रीकृष्ण कालीन व्यक्तिरेखांचा सुध्दा अतिशय समर्पक असा आविष्कार केला आहे. युगंधर मध्ये शेकडो व्यक्तिरेखा आपली हजेरी लावतात. परंतु त्यातील अगदी मोजक्याच व्यक्तिरेखा वाचकांच्या मनावर आपले गारुड घालतात. त्यामध्ये 'श्रीकृष्ण पत्नी' असल्याचे सार्थ सिध्द करणारी 'रुक्मिणी' दिसते. श्रीकृष्णाला आयुष्य भर साथ देणारी 'दारुकाची' व्यक्तिरेखा मनाला भावते. तर मानस भगिनीचा आदर्श ठरणारी 'द्रौपदी मनाला सादवते. श्रीकृष्णाचा परम मित्र होण्याचे भाग्य लाभलेला 'अर्जुन' वाचकांना भेटतो. तर कुरु क्षेत्रावरील निर्णायक युध्दात श्रीकृष्णाला साथ देणारा 'सात्यकी' सेनापतीच्या रुपात वाचकांच्या मनात घर करुन राहतो. तर उध्दवाची शांत मुद्रा वाचकांना भुरळ पाडते. या प्रमुख व्यक्तिरेखा व्यतिरिक्त कर्ण, कुंती, भीम, कंस, युधिष्ठर, सुभद्रा, विदुर, अक्रुर, यशोदा माता, रोहिणीमाता राधा अशा शेकडो व्यक्तिरेखा शिवाजी सावंतांनी आपल्या अलौकिक प्रतिभेव्दारे अक्षरशः सजीव वाटाव्यात अशा शब्द चित्रीत केल्या आहेत.

## ३) भाषाशैली –

वि. सं खांडेकर वळणाची भाषाशैली हे शिवाजी सावंतांच्या लेखणीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये

आणि ते युगंधर या कादंबरी मधून देखील प्रत्ययास येते. मिथकीय वातावरणा निर्मितीसाठी खांडेकरांची भाषाशैली उपयुक्त असलेली दिसते. असाच काहीसा प्रकार युगंधर मध्ये देखील आहे. श्रीकृष्ण चरित्रातील चमत्कारांना वगळता शिवाजी सावंतांनी अनेक मिथकानांच जन्म घातलेला आहे. साहजिकच त्यांच्या लेखनशैलीतून खांडेकरी वळणाची भाषा काही काही वेळा आविष्कृत झाली तरी ती अलंकारिकतेच्या विळख्यात सापडलेली दिसत नाही. विषय, आशयानुसार त्यांच्या शैलीने श्रीमंती स्वीकारलेली आहे.

तात्विक, चिंतगर्भ, अलंकार विरहित, चटकदार भाषाशैली हे मृत्युंजय प्रमाणे युगंधरचे देखील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असलेले दिसते.

## ४) **निवेदन कौशल्य –**

'मृत्युंजय' या कादंबरीचा आकृतिबंध वापरून शिवाजी सावंत यांनी 'युगंधर' या कादंबरीची देखील निर्मिती केली आहे. साहजिकच 'मृत्युंजय' मधीलच निवेदनाची वैशिष्ट्ये युगंधर मध्ये देखील आविष्कृत झालेली दिसतात. 'मृत्युंजय' प्रमाणेच सावंतांनी युगंधर मध्ये आत्मनिवेदनपर प्रतिपादन पध्दतीचाच वापर केला आहे. परंतु कर्णाप्रमाणे मरणोत्तर निवेदन न करता श्रीकृष्ण मरणासन्न अवस्थेत असताना आपली आत्मकथा कथन करतो. त्यामुळे या कथनाला एक वेगळाच जिव्हाळा निर्माण झाला आहे. श्रीकृष्णा व्यतिरिक्त रुक्मिणी, द्रौपदी, अर्जुन, दारुक, सात्यकी, उध्दव देखील आपल्या मनातील श्रीकृष्णा विषयीचे भाव आंदोलन निवेदन करतात. त्यामुळे साहजिकच 'युगंधरला' आत्मकथनात्मक कादंबरीचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

आत्मनिवेदनाची सोय असल्याकारणाने श्रीकृष्णाच्या बाबतीत आजपर्यंत जे जे आरोप करण्यात आले आहेत. त्याचे खंडन करण्यास सावंतांना अतिशय सहज शक्य झाले आहे.

श्रीकृष्णा व्यतिरीक्त युंगधर मध्ये ज्या ज्या व्यक्तींचे निवेदन आले आहे ती मनोगते पुर्णपणे काल्पनिक असून सांवतानी केलेल्या तो स्वच्छंद कल्पना विलासच आहे. याच कल्पना विलासाच्या आधारे आणि भाषेद्वारे निवेदन शैंली द्वारे शिवार्जी सावंतानी युगंधरमध्ये पौराणिक वातावरणाची लिलया निर्मिती करून वाचकांच्या मृत्युंजय मुळे वाढलेल्या अपेक्षा पुर्ण केल्या आहेत.

## ५) **प्रसंग रेखाटन :–**

नाट्यमयाता हा शिवाजी सावंतांच्या लेखनाचा गाभा आहे. त्यामुळे युगंधर मधील अनेक प्रसंग हे उठावदार पद्धतीने आणि नाट्यमय रीतीने साकार झालेले दिसतात. १८ दिवसांच्या ४० लक्ष बळी

घेणाऱ्या घनघोर लढाई नंतर धर्मराज सर्व मृतात्म्यांना तर्पण देण्यास सुरूवात करतात. कर्ण हा सर्वात थोरला पांडव असल्याने कर्णाला पहिली ओंजळ द्यावी असे श्रीकृष्णाने धर्म राजाला सुचविल्यानंतर त्याने व अर्जुनाने केलेला त्रागा विशेषकरून पार्थाने थेट आईच्या म्हणजे कुंतीच्या गळयाभोवती गांडीव धनुष्य घालून व्यक्त केलेला संताप, द्रौपदीने आपले पाचही पुत्र अश्वत्थाम्याने झोपेत मारल्यानंतर केलेला आक्रोश असे अनेक प्रसंग वाचनीय झाले आहेत.

वरील प्रसंगा व्यतिरिक्त श्रीकृष्णाच्या जीवनातील पांडवांच्या जीवनातील आणि कौरवांच्या जीवनातील अनेक प्रसंगांना शिवाजी सावंतांनी नाट्यमयतेच्या पातळीवर नेऊन रंगविण्याचा प्रयत्न केला आहे.

## ६) प्रसंगांना वास्तव रूप देण्याचा प्रयत्न :-

गेली पाच हजार वर्ष एकाहून एक चमत्कारांनी श्रीकृष्ण अंर्तबाह्य नुसता लडबडून गेला आहे! भाबड्या अंधश्रद्धांच्या गुंतावळ्यात अडकून पडलाय. अनेक प्रज्ञासंपन्न महाकवींनी आपल्या दीप्तिमान प्रतिभेच्या तेजस्वी समिधा अर्पून त्याला सामान्यांपासून कोट्यावधी योजना दूर नेऊन ठेवले आहे. अर्थात हे त्यांच्या भाबड्या रससंपन्न भक्ति भावापोटी सहज व अपापत: झाले आहे.

चमत्कारात अडकून पडलेल्या श्रीकृष्ण चरित्राला सर्वसामान्य वाचकांच्या समोर आणून त्याला सर्व सामान्यांशी हितगुज करायला लावण्यासाठी त्याच्या भोवती साठलेल्या चमत्कारांच्या पुटांना बाजूला सारणे आवश्यक होते. त्यासाठी त्याच्या चरित्रातील चमत्कार पूर्ण प्रसंगांना व घटनांना वास्तव जगातील कार्यकारण भावांचा अनुबंध जोडणे आवश्यक असलेले दिसते.

असाच प्रयत्न शिवाजी सावंत यांनी केला असून त्यासाठी त्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील अनेक प्रसंगांना एका वेगळया दृष्टीकोनातून साकार करून वास्तव पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रसंगानमध्ये रानगर्दभ, रानघोडा, कालिया सर्प मर्दन इंद्र पर्वतावरील इंद्रोत्सव अशा अनेक प्रसंगांचा समावेश होतो.

## ७) अनेक प्रसंगाची तर्कशुध्द रचना -

श्रीकृष्ण चरित्रातील अनेक प्रसंगाना वास्तव पातळीवर आणीत असताना शिवाजी सावंत यांनी त्या प्रसंगातील चमत्कारांना तर्क शुध्द दृष्टीने बगल दिली आहे. तसेच काही प्रश्नांची त्यांनी अतिशय तर्कशुध्द पुर्नघटना केलेली दिसते. त्यामध्ये जरासंधाची आक्रमणे परतवून लावण्यासाठी केलेले प्रयास

जरासंधवध, रूक्मिणी हरण, शिशूपालण, शल्य, मद्र, कंस, कालयवण, नरकासुर, दंतवक्र, श्रृगाल अशा असूरी प्रवृत्तींच्या राजांना वधण्याचे प्रसंग अथवा कुरूक्षेत्रावर १८ दिवसांच्या युध्दातील अगणिक प्रसंग जयद्रथाच्या वधासाठी सूर्यग्रहणाचा करून घेतलेला वापर, कर्ण वधाचा प्रसंग आणि नरकासुराच्या कैदेतून १६ सहस्त्र कामरूप स्त्रीयांना सोडविल्यानंतर समाजात त्यांची मानहानी होऊ नये म्हणून त्यांचे पतीपण स्वीकारण्याचा प्रसंग, युध्द समाप्ती नंतरचे अनेक प्रसंग अशा अनेक प्रसंगाची शिवाजी सावंतांनी आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने अत्यंत तर्कशुध्द पुर्नरचना केली आहे.

अशा अनेक चमत्कार पूर्ण प्रसंगांची केलेली तर्कशुध्द पुर्नघटना व त्या प्रसंगांना दिलेले वास्तव रुप हेच युगंधरच्या यशाचे मुख्य सुत्र असलेले दिसते.

## ८) महाभारता मधील श्रीकृष्ण आणि युगंधर श्रीकृष्ण –

ज्याच्या जन्माअगोदर पासूनच ज्याला चमत्कारांच्या जोखडात अडकविण्याचा प्रयत्न झाला तो म्हणजे श्रीकृष्ण होय. जन्मताच कंसाच्या करागृहाची कवाडे आपोआप उलगडून सर्व सैन्याला मुर्च्छित पाडून ओथंबलेल्या यमुनेला आपल्या पायाच्या करांगुलीचा स्पर्श करुन ओहटी लावून मथुरेत पोहचलेल्या श्रीकृष्णाने तर चमत्कारांची लयलुटच केलेली दिसते. अर्भक अवस्थेत असताना पुतना मावशीचा वध करणारा, आपल्या बाल मुखामध्ये यशोदेला ब्रम्हांड दर्शन घडविणारा, अश्वासूर, गर्दभासूर, कालियामर्दन करणारा इंद्राला आव्हान करुन इंद्रनिल पर्वताला उजव्या हाताच्या करांगुलीवर उचलणारा, अजस्त्र शक्तीच्या कंसाला वधणारा, त्याच्या मल्लांना, मदमस्त हत्तींना भिरकावणारा, राधेशी श्रृंगारीक चाळे करणारा, आपल्या मुरलीने वृंदावन वासियांना वेड लावणारा, स्नानमग्न गोपींचे वस्त्रे झाडावर अडकवून त्यांची फजिती पाहणारा, दह्या दुधाची अलोट चोरी करणारा, सोळा सहस्त्र स्त्रियांचा भोग घेणारा, पांडवांचा विजय आणि अर्जुनाचे श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी राजकारणाचे कुटिल डाव टाकणारा, कुरुक्षेत्रावर सहस्त्र हातांचा अवतार धारण करणारा, गीतेचे जडजंबाल तत्वज्ञान सांगणारा अशा केवळ चमत्कार पूर्ण प्रसंगांनी जखडलेला महाभारता मधील श्रीकृष्ण दिसतो.

'युगंधर' मध्ये मात्र शिवाजी सावंतांनी श्रीकृष्णाला देवतत्वाच्या कोषातून बाहेर काढून एकमेव गुणपुरुष असा साकार केला आहे. 'श्री' या आपल्या विशेषणाला तो पूर्णपणे योग्य असलेला दिसतो. श्री म्हणजे सौंदर्य, आरोध सामर्थ्य, अलौकिक बुध्दीमत्ता, अगणिक संपत्ती, अनंत गुणवत्ता[१] या प्रत्येक विशेषणाला अंगीकारणाला श्रीकृष्ण होता.

युंगधर मधील श्रीकृष्ण हा वर्धनशील, संस्कारशील, कुटूंबवत्सल, युगपुरूष, वर्ण निर्भयतेचा आणि पौरुष चैतन्याचा आदर्श, अर्जुनाचा सखा, दृष्टांचे निर्दालन करणारा महानायक, अष्टावधानी, युगानुयुगे शिरोधार्थ मानावी अशी जीवनप्रणाली जगलेला युगंध राधेला गुरूपद देऊन स्त्रीत्वाला मोठा अर्थ प्राप्त करून देणारा. अशा अनेकविध गुणात त्याला शिवाजी सावंतानी युगंधर मध्ये चितारलेला आहे सारांश युगंधर मध्ये तो पुर्णपुरूष म्हणून वावरताना दिसतो. हेच युगधंरचे आगळे वेगळेपण आहे.

## ९) 'युगंधर' मधील काल्पनिक प्रसंग –

आजपर्यंत अनेक प्रतिभावंतांनी श्रीकृष्णाच्या एखाद दुसऱ्या गुणाला मध्यवर्ती स्थान देऊन अनेक कलाकृतीची निर्मिती केलेली दिसते. परंतु श्रीकृष्णाच्या जन्मापासून ते अखेर पर्यंतच्या चरित्राला कोणत्याही अभ्यासकाने, साहित्यिकाने, वाचकांच्या समोर सादर करण्याचा प्रयत्न केला नाही. मराठी मध्ये असा प्रयत्न केला तो शिवाजी सावंत यांनी. त्यांनी युगंधर या कादंबरीच्या रूपाने श्रीकृष्णाला त्याच्या संपूर्ण चारित्र्यासह सादर करण्याचा यशस्वी आणि अभिनंदनीय प्रयत्न केला आहे.

युगंधर मधील श्रीकृष्णाचे बालपण, आपल्या सातही पत्नीच्या बरोबर रमणारा कुंटुब वत्सल श्रीकृष्ण, अर्जुना बरोबरचे त्याचे मैत्रिपूर्ण प्रसंग, सखी द्रौपदीच्या मनात श्रीकृष्ण बद्दल असणाऱ्या भावभावना, सारथी असून सुध्दा श्रीकृष्णाने ज्याला आपला विश्वस्थ मानला त्याच्या निवेदनातून आलेलया श्रीकृष्णाच्या आठवणी, सेनापती सात्यकीला आपल्या धन्याचे जाणविलेले मोठेपण, तर भावविश्व म्हणून वावरणाऱ्या उध्दवाने श्रीकृष्णाच्या व्यक्तीमत्वाचे केलेले वर्णन या आणि अशा अनेक गोष्टी की ज्या महाभारताच्या अथवा त्यावरून तयार झालेल्या कलाकृतींच्या संहितेत कोठेही आढळणार नाहीत. अशा अनेक जागा शिवाजी सावंतांनी आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने 'न भूतो न भविष्यती' अशा भरून काढल्या आहेत. हेच युगंधरचे सर्वात महत्तवपूर्ण असे वेगळेपण असलेले दिसते.

'मृत्युंजय' 'छावा' 'युगंधर' या तीनही कादंबऱ्या म्हणजे संपूर्ण मराठीच नव्हे तर अखिल भारतीय साहित्य विश्वाला त्या दीपस्तंभासारख्या मार्गदर्शक व आदर्शवत ठरताना दिसतात. त्यांचे हेच मोठेपण नेमके कशात आहे. ह्याचा आपण प्रस्तुत प्रकरणात ऊहापोह केला असून या पुढील प्रकरणात आपण शिवाजी सावंत यांच्या या तीनही कादंबऱ्या मधील 'वादग्रस्त आणि लोकोत्तर' अशा नायकांच्या व्यक्तिमत्वाला त्यातील वेगळेपणाला आकळण्याचा प्रयत्न करणार आहोत.

# संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | युगंधर साहित्यिक | : | संपादक - जयराम देसाई<br>प्रकाशन - कमळाई प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती - पहिली, ३० डिसेंबर २००२,<br>पृ. २१७ |
| २) | कर्ण खरा कोण होता ? | : | लेखक - दाजी पणशीकर<br>प्रकाशन - रविराज प्रकाशन, पुणे<br>आवृत्ती - आठवी, १९९९ पृ. १० |
| ३) | युगंधर साहित्यिक | : | संपादक - जयराम देसाई<br>प्रकाशन - कमळाई प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती - पहिली, ३० डिसेंबर २००२,<br>पृ. २१० |
| ४) | मृत्युंजयकार शिवाजी सावंत :<br>व्यक्ती आणि साहित्य | : | संपादक - शांताराम वाघ<br>प्रकाशन - शशीदीप प्रकाशन, पुणे<br>आवृत्ती - प्रथम, १ जानेवारी २००१ पृ. ११ |
| ५) | तत्रैव | : | पृ. ५३ |
| ६) | तत्रैव | : | पृ. ४९ |
| ७) | शिवपुत्र संभाजी | : | लेखक - कै. प्रा. डॉ. सौ. कमल गोखले<br>प्रकाशन - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती - चौथी, २००१ पृ. ३३६ |
| ८) | मृत्युंजयकार शिवाजी सावंत :<br>व्यक्ती आणि साहित्य | : | संपादक - शांताराम वाघ<br>प्रकाशन - शशीदीप प्रकाशन, पुणे<br>आवृत्ती - प्रथम, १ जानेवारी २००१<br>पृ. २६५ |
| ९) | युगंधर | : | लेखक - शिवाजी सांवत,<br>प्रकाशन - कौन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती - प्रथम, पुर्नमुद्रण - २००५<br>आचमन |